चांगल्या विचाराला वाहिलेली एक चळवळ

# विचार प्रसार

वर्ष चौथे — मार्च २००८ — मूल्य रु. ३/-

संपादक - नारायण डोंगरे

## हा महाराष्ट्र शिवरायांचा होवो!!

फेब्रूवारी महिन्यात तारखेप्रमाणे शिवजयंती झाली. ह्या महिन्यात म्हणजे मार्चमध्ये येणारी शिवजयंती ही तिथीप्रमाणे म्हणजेच मराठी दिनदर्शिकेप्रमाणे येणारी आहे. छत्रपती शिवरायांच्या काळी जी पद्धत होती तीच पद्धत आपण त्या व्यक्तीच्या जयंतीसाठी ग्राह्य धरण व त्यादिवशी साजरा करणे कदाचित जास्त योग्य, असे आम्हाला वाटते.



तरीही आज आपण ज्ञानवंत होत चाललोत, तसेच संख्येनेही अफाट होत चाललो आहोत. अशा वेळेस मतभेद येणार. ह्या मतभेदामुळे आपण शिवजयंती दोनदा साजरी करावी किंवा दहादा साजरी करोत, फक्त ती आनंदाने आणि जल्लोषालने साजरी करावी, एवढेच महत्त्वाचे.

आज आपला महाराष्ट्र हा 'भारत' नावाच्या लोकशाही देशात येतो. 'लोकशाही' म्हणजे घरात लोकांनी आरामात बसणे. पाच वर्षातून एकदा सेकंदभर मतदानयंत्राचे एक बटण दाबायचे आणि पुन्हा पाच वर्षे आरामात राहायचे!.

**संपादकीय**

हिंदुस्थानात एकेकाळी सर्वत्र हिंदूंची साम्राज्ये नष्ट झाली होती किंवा ती गुलाम वा अंकित तरी झालेली होती. मोगलाई, आदिलशाही, निजामशाही अशा मुसलमान शाह्यांची राज्ये सर्वत्र होती. या देशात, हिंदू प्रजेवर ही राज्ये राज्य करीत होती, अत्याचार करीत होती, लोकांच्या शेंडीवरदेखील कर लावत होती, मंदिरे खुलेआम तोडली जात होती, मूर्ती फोडल्या जात होती. हिंदू रयतेला हाणून-मारून बाटवत होती. कुणीही यावे, शेत तुडवावे, कुणीही यावे आणि आपल्या आयाबहिणींच्या अब्रुवर घाला घालावा अन् गरीब बिचाऱ्या प्रजेने ते मुकाट्याने सहन करावे,

स्त्रियांना पळवून त्यांची विक्री करायची वा त्यांना परदेशात पाठवून द्यायचे अशी अराजकता होती. आपल्याला आपले सणही खुलेआम साजरा करता येत नव्हते. अपराधी उजळमाथ्याने वावरत होते. जनतेचा कोणी वाली नव्हता. अशा प्रतिकूल काळात आदिलशहा, निजामशहा यांना गारद करून मोगल बादशहाशी टक्कर देणारे, आई जगदंबेच्या आशीर्वादाने आणि माँ कालीच्या पराक्रमाने वयाच्या दहाव्या वर्षीच रोहिडेश्वराच्या मंदिरात घेतलेली 'आण' पूर्ण करणारे श्री छत्रपती शिवाजी महाराज ह्यांनी मराठी साम्राज्य आणि हिंदू राज्य स्थापन केले. हिंदवी स्वराज्याची महाराष्ट्रात स्थापना केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या बालपणापासून पुढच्या जीवनात अपराध्यांना शिक्षा केल्या. हातपाय छाटले जाऊ लागले. स्त्रियांना विकत घेणाऱ्यांना राज्याबाहेर आपले बस्तान हलवावे लागले. रयतेची गरिबी गेली. क्रुरतेचा अंधार दूर गेला.

पण आज शिवरायांच्या त्याच महाराष्ट्रात ३५०-४०० वर्षानंतर पुन्हा तीच तऱ्हा आली आहे. राज्यात पूर्वीप्रमाणे स्त्रिया खुलेआम विकल्या जात नाहीत, परंतु त्यांच्या छुप्या विक्रीसाठी बार निर्माण झाले आहेत. हे बार लोकशाही नामक व्यवस्थेने निर्माण केले आहेत. ते बंद करण्याचा कोणी प्रयत्न केलाच तर त्याला 'कायदा'नामक व्यवस्थेने शिक्षा होणार. हे 'लेडीज बार' जर चांगले असते तर महाराष्ट्रातील उच्चभ्रूंनी आपल्या बायका, मुली, सूनांना कंपनीत कामाला लावण्याऐवजी बारमध्ये कामाला पाठवले असते.

मागे एकदा एका गावात स्त्रियांनी दारूबंदीसाठी मतदान केले. गाव दारूमुक्त झाले. दारूवाल्यांनी कायद्याचा व्यवस्थित अभ्यास करून गावात पुन्हा मतदान घडवून आणले आणि दारूचा विजय झाला. आता त्या गावात दारू खुलेआम विकली जात आहे. खरोखरच, कायदा खूर्चीवर बसलेला आणि डोळ्यांत पाणी भरलेल्या स्त्रिया जमिनीवर बसलेल्या दिसल्या. त्या लढाई आणि युद्धही हरल्या होत्या.

येथे लेडीज बार दिसल्यावर हा शिवरायांचा महाराष्ट्र आहे, असे वाटत नाही. तो मोगलांच्या काळातला महाराष्ट्र वाटतो. लेडीज बार दिसला की हा शिवरायांचा महाराष्ट्र असला तरी, त्यावर थुंकावेसे वाटते. इथे नववर्षाच्या स्वागताच्या दिवशी एका युवतीवर (तिचाही त्यात दोष आहेच) १४-१५ जण तुटून पडल्याचा प्रकार घडतो. सतत दोन वर्षे अशा बिभत्स घटना घडत आहेत. त्याला उपमुख्यमंत्री आर. आर. पाटलांएवढीच 'लोकशाही'नामक व्यवस्थाही कारणीभूत आहे.

अण्णा हजारे यांच्या राळेगण या गावाला 'आदर्श गाव' म्हणून गणले होते. म्हणतात त्या गावात सुपारी-तंबाखूही मिळत नाही. बिडी-सिगारेट दूरची गोष्ट. आणि दारू तर खूपच दूरच. महाराष्ट्रातले प्रत्येक गाव केव्हा 'राळेगण'सारखे होईल? केव्हा प्रत्येक गावातील तरुण व वृद्ध गावात शिवरायांचे राज्य आणतील?

महाराष्ट्र प्रगत राज्य होतेय. पण सांस्कृतिकदृष्ट्या अधोगतीकडे जात आहे. उद्या हा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकरांचा म्हणायची त्यांच्या भक्तांना, अनुयायांना लाज वाटेल. हा पैसेवाल्यांचा, नंग्यांचा, चरशींचा आणि भिकाऱ्यांचा महाराष्ट्र झालेला असेल. हा महाराष्ट्र सभ्य, सुसंस्कृत, प्रामाणिक आणि आदर्शांचा राहणार नाही.

तरीही आपण आशा करूया की ह्या महाराष्ट्रात दारूची दुकाने, लेडीज बार चुकूनही राहू नयेत. स्त्रियांनी जशी गावात दारूबंदी घडवून आणली तशी दारूबंदी आणि लेडीजबारबंदी संपूर्ण महाराष्ट्रात घडून येवो आणि हा महाराष्ट्र शिवछत्रपतींचा होवो!

**- नारायण डोंगरे**



Scanned with CamScanner

# वाईटाचा स्पर्शही नको

श्यामला दररोज एका वाईट स्वभावाच्या व्यक्तीबरोबर बोलताना, फिरताना, शाळेत येता-जाताना सर पाहायचे. सरांनी श्यामची ती संगत योग्य वाटत नव्हती. पण त्या व्यक्तीची संगत सोड असे सरांना थेट बोलताही येत नव्हते.

तरीही एकदा सरांना त्यांच्या अंतर्मनाने जागे केले आणि त्यांनी दुसऱ्या दिवशी मूल्यशिक्षणाच्या तासाला श्यामशी त्याच्या संगतीबद्दल बोलायचे ठरवले.

शाळा भरली. सगळी मुले आली. प्रतिज्ञा, प्रार्थना झाल्यावर मुले ध्यानमग्न झाली. सरांनी सांगितल्यानंतर मुलांनी डोळे उघडले. सर बोलू लागले -

"मुलांनो, मी तुम्हाला वाईट संगतीने किती नुकसान होते ते पूर्वी सांगितले. परंतु नुसत्या स्पर्शानेसुद्धा किती वाईट होते ते आज सांगतो..." आणि सरांनी सांगायला सुरुवात केली.

प्रभू श्रीरामचंद्र उद्या अयोध्या नगरीचा राजा होणार, असे दशरथ महाराज दरबारात घोषित करतात. 'राम राजा होणार' अशी दवंडी नगरात पिटवली जाते. कौसल्यामातेलाही ती बातमी दासीकरवी समजल्यावर आनंद होतो. तीच बातमी भरताची माता कैकयीलाही तिच्या दासीकरवी समजते. कैकयी माता आनंदाच्या भरात एवढी चांगली बातमी सांगणाऱ्या दासीला गळ्यातला कंठाच बक्षीस म्हणून देते. तिला राजमाता कौसल्यापेक्षाही जास्त आनंद होतो. कारण राम हा लहानपणापासून जरी कौसल्यामातो मुलगा असला तरी दूध-भात खायाला, गोष्ट ऐकायला माता कैकयीकडे असायचा. तर भरत राजमाता कौसल्येकडे रमायचा. म्हणूनच माता कैकयीचा आपल्या भरतापेक्षा जास्त जीव रामावर होता.

'राम राजा होणार' ही बातमी रावणाच्या बंदीवासात असणाऱ्या देवांना कळते. तसे ते देवी सरस्वतीला बोलावतात. आपल्याला बोलावण्याचे कारण जेव्हा सरस्वती देवांना विचारते, तेव्हा ते सांगतात, "उद्या राम राजा होणार आहे." त्यावर सरस्वती म्हणते, "आनंदाची गोष्ट आहे ही!" तिला थांबवत देव स्पष्टीकरण करतात की तसे झाले तर राम फक्त आपल्या अयोध्येतील प्रजाजनांच्या सुखाचाच विचार करेल आणि आम्ही सारे देव असेच रावणाच्या बंदिवासात पडून राहू. तसे घडता कामा नये. राम राजा होणार नाही आणि तो इकडे कसा येईल, याचा विचार करून कुणाच्या तरी जिभेवर बसून वाचा बदल.

देवांचे बोलणे ऐकल्यावर सरस्वती तेथून निघून जाते आणि थेट अयोध्या नगरी गाठते. नगरीत सर्वत्र आनंद पसरलेला असतो. प्रजा आनंदाने आणि लगबगीने सोहळा साजरा करायची तयारी करीत असते. राजवाड्यात सर्वांची धांदल उडालेली असते.

सरस्वती अख्ख्या अयोध्या नगरीत फिरते. आपल्याला कोणाच्याही मुखातून 'राम राजा होऊ नये' असे वदवून घेता येणार नाही, याची खात्री पटते. शेवटी ती दशरथाच्या महालात येते. तिथेही तिला तिच्यायोग्य व्यक्ती आढळत नाही. कैकयी तिच्या दृष्टीस पडते. पण तिच्याही मनात अयोध्यावासियांप्रमाणेच राम आणि रामच भरून राहिला होता.

कैकयीच्या शेजारी तिला तिची कुबडी मंथरा दासी दिसते. अयोग्य वर्तनासाठी सरस्वतीला ती योग्य वाटते. कारण ती प्रथम अयोध्यावासी नव्हती. कैकयीने विवाहाच्या वेळी आपल्या माहेराहून आणलेली ती दासी होती. दशरथ-कैकयीच्या स्वयंवरात ती



Scanned with CamScanner

अयोध्येला आली होती.

सरस्वती ही मंथरेच्या जिभेवर विराजमान झाली आणि मंथरा बोलू लागली.

"राणी कैकयी, राम राजा होतोय."

कैकयी : चांगलीच गोष्ट आहे ती. राम ज्येष्ठ पुत्र आहे. दशरथाची प्रथम पत्नी कौसल्येचा तो पुत्र आहे. तोच राजा व्हायला हवा.

मंथरा : पण भरत आजोळी असताना रामाच्या राज्याभिषेकात काहीतरी काळेबेरे वाटते.

कैकयी : तसे काही नाही. राजा दशरथाची काहीतरी अडचण असेल. आणि काय फरक पडेल जर भरत आजोळी असताना रामाचा राज्याभिषेक झाला तर?...

मंथरा : पण दोन दिवस थांबून नंतर जर रामाचा राज्याभिषेक झाला काय नुकसान होणार आहे. भरतही मोठ्या भावाचा राज्याभिषेक सोहळा पाहील.

कैकयी : हे बघ महाराज जे काही करताहेत ते योग्य करताहेत. चल, तू रामाच्या राज्याभिषेकासाठी आपलाही महाल सजव."

मंथरा : मी आपल्या मुलाचा विचार करते आणि तू...

एवढे बोलून ती ढसाढसा रडायला लागली. शेवटी अश्रू हे स्त्रीचे शेवटचे अस्त्र. तेच ती कैकयीवर फेकते. मंथरेला रडताना पाहून कैकयी तिचे आसू पुसण्यासाठी तिला स्पर्श करते. जसा कैकयीचा मंथरेला स्पर्श होतो तसा तिचे बोलणे मंथरेला पटू लागते. ते सत्य वाटू लागते. जणू सरस्वती कैकयीच्याच जिभेवर बसल्यासारखे वातावरण निर्माण होते. त्यामुळे कैकयीच्याही मनात विचार येतो की खरेच माझ्या भरताला बोलावून नंतर राज्याभिषेक केला तर काय बिघडणार आहे? ह्यांचा काहीतरी कपट दिसतोय. मग तिला मंथराची प्रत्येक गोष्ट पटू लागते. तिचे मन नकळत त्याच गोष्टी करत गेले. त्यातच तिला दोन वरांची आठवण झाली. दोन वर कोणते मागायचे हे सरस्वतीनेच सूचविले. पहिला वर होता भरताचा राज्याभिषेक आणि दुसरा वर म्हणजे रामाचा चौदा वर्षे वनवास.

कैकयीला केवळ आपला पुत्र राजा बनावा असे वाटत असते तर तिला एकच वर पुरेसा होता. पण तिच्या जिभेवर सरस्वती बसली होती. तिला देवांना बंदिवासातून सोडवायचे होते. म्हणून कैकयीशी तसा काहीच संबंध नसलेला रामाच्या वनवासाचा अन् तोही चौदा वर्षे वनवासाचा वर तिने दशरथाकडे मागितला. तो वर न मागताही भरत राजा बनू शकला असता.

मुलांनो, वाईटाला चुकूनही स्पर्श करू नका. त्या एका स्पर्शाने तुमचे वाईट होईल. आपल्या पुढच्या पिढीचे वाईट होईल. संसाराचेही वाईट होईल. लोक भेटले तर त्यांना लांबूनच 'राम राम' करा. त्यांचा चुकून स्पर्श झाला तर 'राम' म्हणा. त्यामुळे वाईट स्पर्शाचा परिणाम होणार नाही.

## स्वभाव एकेकाचा

कुत्र्याची शेपटी वाकडीच असणार; साप नेहमी वेडावाकडाच चालणार; माशी घाणीवरच बसणार; डुक्कर नेहमी चिखलातच लोळणार; विंचू नांगी मारण्यातच धन्यता पावणार.

नीच प्रवृत्तीची माणसे इतरांमधील दोष हुडकण्यासाठी टपलेले असतात. एखाद्या वक्त्याने पांडित्यपूर्ण भाषण केले किंवा प्रवचनकाराने बोधपर प्रवचन दिले तरी त्यामधील बोध घेण्याऐवजी वक्त्याने चुकीचा शब्दप्रयोग कसा वापरला किंवा प्रवचनकाराने शब्द कसा चुकीचा उच्चारला तेच उगाळत बसतात. वराहवृत्तीच्या ह्या व्यक्ती वक्त्याला किंवा प्रवचनकाराला मुद्दाम भेटून त्यांची ती अतिगंभीर (?) चूक त्यांच्या निदर्शनास आणून देणार. चालायचेच. डुकराने सुगंधी उटणे लावून अभ्यंग स्नान करावे, ही अपेक्षा सूज्ञांनी कां वरे बाळगावी?



Scanned with CamScanner

# ढुंढते रह जाओ गे!

काळ इ.स.पूर्व पाचवं शतक. स्थळ ग्रीस. तत्वज्ञ डेमॉक्रिटस. याने एक भन्नाट तत्त्वविचार जगाला दिला. Nothing exists except atoms and the void. Everything else is conjecture. अर्थात सूक्ष्मतम अणू (Atom) हा शून्याला खूप जवळचा, या अर्थाने विश्वाची निर्मिती जवळजवळ शून्यातून झाली असा काहीसा हा विचार. तत्कालिकांनी कुठे कुठे नोंदवलेला हा विचार झिरपत झिरपत आधुनिक जगात आरामात पोचला. त्यामुळे अ‍ॅटम हा शब्द व संबंधित संकल्पना (म्हणजे पृथ्वीवरील यच्चयावत सजीव/निर्जीव वस्तू अणूला अणू जोडूनच बनलेल्या असतात ही) यांचा आद्य उद्गाता म्हणून आजचं जग डेमाक्रिटसला ओळखतं.

मराठी विश्वकोषात (खंड ३, पृ-२४९) असं नोदंवलंय की इ.स.पूर्व सहाव्या शतकात आपल्याकडे कणाद नावाचा एक तत्त्वज्ञानी प्रयागजवळ प्रभास येथे होऊन गेला. त्यानेही चराचर सृष्टीच्या जडणघडणीबद्दल नेमकी हीच संकल्पना डेमॉक्रिट्सच्या निदान पन्नास-पाउणशे वर्षे अगोदरच मांडली होती. अणू ही संज्ञा कणादाची. मनात सहज विचार आला. शून्याधारित दशमान अंकलेखन गणनपद्धती ही क्रांतदर्शी संकल्पना (Break Throgh Concept) जशी जगाला हिंदुस्थानची देणगी आहे, तशीच ही अणूसंकल्पनासुद्धा मूळची आपलीच असावी, असेल का? कदाचित असेलही. उघड आहे की 'असेलही'च्या जागी आहे म्हणायला कुणाही भारतीयाला अभिमान वाटेल, आनंद वाटेल. पण त्यासाठी मुंबईतली टाटा मूलभूत संशोधन संस्था, पुण्यातलं भास्कराचार्य प्रतिष्ठान, अशा संस्था किंवा अन्य कुणी एकलव्याने संशोधनाअंती पुराव्याने आधी हे निर्विवाद सिद्ध केले पाहिजे. नंतर लगोलग प्रसिद्ध केलं पाहिजे. इंटरनेटवर प्रसृत केलं पाहिजे. शंकेखोरांचं समाधान केलं पाहिजे, वगैरे. कदाचित, हे शून्यायण आधीच घडून गेलंही असेल. तरी माझ्यासारखे ग्यानबा बक्कळ हाईती. म्हणून या बाबतीत जाणकाराचा एक सटीक लेख (रविवारीय वृत्तपत्र पुरवणीत) इत:पर यायला हवा. आमच्यासारख्या येरूंचे नव्याने प्रबोधन होईल.

संशोधनाचा हा नवा विषय सोडा, पण सुमारे पंधराशे वर्षे प्रचलित असलेल्या आपल्याच या शून्याधारित दशमान अंकलेखन गणनपद्धतीचा इतिहाससुद्धा मजेदार आहे. आज जरी एक ते नऊ व शून्य या दहा अंकांवर (digits) व्यावहारिक अंकगणिताचं मजेत भागत असलं तरी ही पद्धत सुरू होण्यापूर्वी जी अंकलेखन गणन पद्धती अस्तित्वात होती त्यात मूळ अंक (digits) होते साठ. आज आपण अकरापासून पुढची कितीही संख्या लिहिण्यासाठी एक ते नऊ व शून्य अशा दहा अंकांनाच शिस्तीत वेठीला धरतो तसं करायला तेव्हा पहिल्या साठ अंकांपर्यंत सोयच नव्हती. एकसष्ठाव्या संख्येपासून पुढे तसं करता येई. इजिप्त परिसरात विकसित झालेली ही किचकट साठ अंकीय बॅबिलोनीय पद्धती (दशमान पद्धतीपूर्वी) सुमारे अडीच हजार वर्षे वापरात होती.

इसवी सनाच्या सातव्या शतकात जेव्हा पश्चिमी जग तमोयुगात चाचपडत होतं, तेव्हा पंजाबच्या ब्रह्मगुप्ताने (५९८-६६५) शून्याची संकल्पना मांडून शून्यासाठी चिन्ह निश्चित करून प्रचलित केलेली दशमान अंकलेखन गणन पद्धती



Scanned with CamScanner

हिंदुस्थान-अरेबिया-स्पेन-इटली करत करत अकरा-बाराव्या शतकात युरोपात पसरली आणि तिथल्या बोजड रोमन अंकलेखन पद्धतीला मोडीत काढत काढत साऱ्या जगभर स्थिरावली. युरोपातल्या अभ्यासू गणितींनी या सुटसुटीत पद्धतीचे स्वागत तर केलेच, शिवाय बँकर्स, व्यापारी मंडळीत आणि शिक्षणव्यवस्थेतही ही पद्धत रुजवली. पुढे याच सुलभ पद्धतीमुळे विविध गणिती संकल्पना व तर्कशुद्ध गणिती परिभाषा विकसित झाल्या. गणितशास्त्राच्या (mathematics) शाखोपशाखांचा दणादण विस्तार झाला व याच शाखोपशाखांच्या सहाय्याने अन्य भौतिक शास्त्रांच्या (फिजिक्स, केमिस्ट्री, धातुशास्त्र, इंजिनिअरींग, पूलबांधणी, इमारत बांधणी, वैद्यकशास्त्र इत्यादी) संशोधनाला, विकासाला ज्ञानप्रवण पश्चिमेत १४०० ते १६०० या प्रबोधनकाळात जे उधाण आले, तेच आजच्या शास्त्रीय व भौतिक प्रगतीला पायाभूत ठरलं.

विविध अंगांनी होत असलेला हा ज्ञानसंचय त्या युरोपीय भगिरथांनी आपापल्या भाषांत ग्रंथबद्ध करून, भाषांतरे करून अवघं पश्चिमी जग ज्ञानसमृद्ध करून सोडलं. परिणामी सिद्ध झालेल्या दुर्बीण, होकायंत्र, नौकानयनशास्त्र, तोफा, बंदुका, गनपावडर आदि साधनांमुळे नाविक सामर्थ्य, नव्या भूप्रदेशांचा शोध, व्यापारवृद्धी, वसाहती स्थापना, लष्करी वर्चस्व आणि अंतिमत: सत्ता संपादन पाश्चिमात्यांना सहज शक्य झालं. या अगदी कालपरवाच्या इतिहासापासून आपण आज समजून घ्यायचं ते हेच की ज्ञानसमृद्ध जनभाषा हीच त्या भाषिकांची, संस्कृतीची, प्रदेशाची तारकसंजीवनी होत असते. चीन, जपान, कोरिया आणि इस्राएल या देशांनी स्वभाषा भराभर ज्ञानसमृद्ध, सक्षम करून अत्याधुनिक संगणक क्षेत्रापर्यंत आपापल्या भाषांतच मुसंडी मारली.

यावरून संभवत: आपणही माझ्याशी सहमत व्हाल की कथा, कादंबरी, कविता ही ललितलेणी भाषेचं बाह्यस्वरूप सजवणारी आभूषणं आहेत, अन्न नव्हे. म्हणूनच भाषिकांनी मूलत: विविध विषयांत ज्ञाननिर्मिती करत राहून, ते ज्ञान स्वभाषेत ग्रंथबद्ध करून भाषेच्या अंतरंगातच ज्ञानपोषण करत राहीलं पाहिजे. आणि अन्य भाषांतील ज्ञानविज्ञान साठ्यांची भाषांतरे करून आपल्या मातृभाषेचं ज्ञानसामर्थ्य वाढवत राहिलं पाहिजे. तसंच ज्या भाषेतला ज्ञानप्रकाश अन्य भाषांचा परिघात पोहोचतो, त्या त्या परभाषिकांच्या नजरेत संबंधित भाषा व संस्कृती आपोआप भरतात. जसे आपल्या मरगळलेल्या मराठी भाषा संस्कृतीचे म्हणजे आजकाल प्राचीन भारतीय वेदवाङ्मय, योगविद्या आणि आयुर्वेद यांच्याबद्दल जगभर वाढते कुतूहल असल्याने या विषयांची मूळ संहिता समजून घेण्यासाठी पाश्चिमात्य चिकित्सक, संस्कृतचेही डोळस परिशिलन, आपल्यासारखी पोपटपंची नव्हे, आजकाल करत आहेत.

इथे मला आणखीन एक सुचवायचंय की गणितशास्त्र हे Science of mathematics असं म्हटलं जातं तरी वस्तुत: गणितशास्त्र म्हणजे एक ते नऊ अंक, शून्य, काही चिन्हे, विविध आकृत्या व तर्कबुद्धी यांचाही अक्षरांबरोबर समावेश असलेली एकमेव, सूत्रमय, विकसनशील, समृद्ध ज्ञानभाषाच आहे. मात्र या तर्काधिष्ठित भाषेत भाबडेपणा, भोंगळपणा, दुटप्पीपणा, मानभावीपणा, चोंबडेपणा, खोटेपणा आणि तत्सम मानवी भावभावनांना काडीचा भाव नाही. बिल्कुल थाराच नाही म्हणाना! त्यामुळेच असेल, पण काही महानुभावांना गणित मानवत नाही. गणिती भाषेचा नेमका बाणा समजून घ्यायला मराठी भाषेतलीच उदाहरणे घेऊया.

"हेच गणिताचं यश आणि अपयशही" ही झाली प्राध्यापकी वळणाची कै. सत्यकथेची भावविभोर विदग्ध एम.ए. मराठी भाषा. तसंच



Scanned with CamScanner

"तुमचंही बरोबर आहे आणि त्यांचंही - (हे बहुदा साहेब, श्रेष्ठी, शिष्टमंडळाचे नेते वगैरे) - चूक म्हणता येणार नाही," ही राजकारण्यांची चिरंतन टोलवाटोलवीची गोलगोल भाषा, तर ज्याचे दात त्याच्याच घशात घालणारी "बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर" ही एक घाव दोन तुकडे करणारी चोख गणिती भाषा.

ज्ञानविज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आज युरोप/अमेरिका आदि पश्चिमी जगताचा जो वरचष्मा आहे त्याला त्यांची ज्ञानलालसा, उद्यमशीलता साहसीवृत्ती आदि अंगभूत गुण तर कारणीभूत आहेतच पण किंचितशी अतिशयोक्ती करायची तर, हा पश्चिमी प्रगतीमहाल उभारला गेला आहे तो भारतीय शुन्याधिष्ठित दशमान अंकलेखन गणन पद्धतीच्या भक्कम पायावर. एका अर्थी अक्षरश: आपल्या शून्यातून त्यांनी त्यांचं आजचं पश्चिमी जग निर्माण केलं आहे. कारण तंत्रज्ञान विकासाला आधार विज्ञानाचा, विज्ञानाला आधार गणितीभाषेचा आणि गणितभाषेच्या सर्वसमावेशक विकासात शून्याचं स्थान एकमेवाद्वितीयम्. अशा अद्वितीय शून्याची नकळत निर्यात करणारा देश म्हणजे, तमोयुगात (Dark ages) बौद्धिक संपदेत खरंच सारे जहाँसे अच्छा असलेला, हिंदोस्ता हमारा.

सातव्या-आठव्या शतकापर्यंत आपल्या पूर्वजांकडे असलेली ही स्वयंप्रज्ञा कशी कशी आणि का विझत गेली हा जसा कितीतरी पिएचड्यांचा विषय आहे, तसंच अकराव्या शतकात त्यांच्या हाती पडलेल्या आपल्या शून्याच्या आधारे सोळा सतराव्या शतकांपर्यंत आधी ज्ञानविज्ञान तंत्रज्ञान व पाठोपाठ विजिगीषु साहित्य, संस्कृती, तत्त्वज्ञान विकसीत करून पश्चिमेने जमेल तितक्या उर्वरित जगाला जवळजवळ विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत टाचेखाली दाबून ठेवण्याची किमया कशी काय साध्य केली हाही आपण आत्मपरिक्षण करण्याचाच विषय आहे. याला जी काही भलीबुरी कारणं असतील ती असोत पण त्यांचा शुभारंभ ज्या शून्यातून झाला ते शून्य मात्र आपलंच Export quality product असावं, हा दैवदुर्विलास.

विसावं शतक आलं तेच मुळी इलेक्ट्रॉनिक्सचा नजराणा घेऊन. १९२५-३५च्या सुमारास संगणकाच्या पहिल्या पिढीच्या बांधणीच्या घडामोडीतच दशमान पद्धतीतल्या २ ते ९ अंकांना स्वेच्छानिवृत्ती घ्यावी लागली, फक्त शून्य व एक या दोनच अंकांना डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स जगात स्थान उरलं. कारणे दोन. दशमान पद्धतीतल्या दहा डिजिट्सच्या माध्यमाने गणिती विश्वात जे जे करता येत होतं (कुठलीही संख्या व्यक्त करणं आणि +, x, -, आदी गणिती प्रक्रिया करू शकणं वगैरे) ते सर्व काही द्विमान पद्धतीतल्या शून्य व एक या दोन डिजिट्सच्या माध्यमानेही करणं शक्य आहे, ही तात्त्विक समजूत विकसित झाली होती, हे कारण पहिलं. आणि त्यामुळेच शून्यासाठी एक व एकसाठी दुसरं अशी दोनच प्रातिनिधिक सर्किट्स बांधली की काम भागतं, ही व्यावहारिक सोय, हे दुसरं कारण.

गणिताच्या भाषेत बोलायचं तर शून्य आणि एक हे दोनच अंक (Binary digits) इथून पुढे डिजीटल इलेक्ट्रॉनिक्स दुनियेच्या अस्तित्वासाठी आवश्यक आणि पुरेसेही आहेत.

आपला संवाद सुरू झाला होता तो "शून्यातून विश्व निर्माण झालं असावं" या अडीच हजार वर्षांपूर्वीच्या ग्रीक तत्त्वविचाराने. त्यानंतर बाराशे वर्षांनी एका भारतीयाला वास्तव गणिती शून्याचा साक्षात्कार झाला. त्यालाही आता तेराशे वर्षे झाली.

या कालखंडातलं भारताचं त्या तोलामोलाचं दुसरं योगदान शोधायला जाल तर शोधतच रहाल. ढुंढते रह जाओगे.

*- चंद्रकान्त गवाणकर,*



Scanned with CamScanner

## कधि रे येईल तो मधुमास

दलितांच्या सुख-सुमनांचा तो घेऊन गोड सुवास
कधि रे येईल तो मधुमास

शिशिर ऋतूचे दिवस संपले
स्वातंत्र्याचे वृक्ष बहरले
तरी कुठे ना अजून दरवळे रानफुलांचा वास
कधि रे येईल तो मधुमास

दारिद्र्याची रेषा घटली
प्रगतीलाही शिंगे फुटली
परि आजही कष्टकऱ्यांना मिळे न सुखाचा घास
कधि रे येईल तो मधुमास

कुठे दिसेना नोकर भरती
छोटे धंदे उजाड पडती
करभाराचे ओझे वाहून जनता होय निराश
कधि रे येईल तो मधुमास

शेतकरी ते भकास झाले
कर्जापायी बुडूनी गेले
त्या सर्वांचा या देशातील संपविण्या वनवास
कधि रे येईल तो मधुमास

आश्वासन जरी कोटीकोटीचे
वांदे परी त्या सुक्या रोटीचे
रक्तपिपासू नेत्यांचा तो सुटेल कधि गळफास
कधि रे येईल तो मधुमास

जन्मा येईल कधि रघुपती
सत्याचरतील कधि दुष्टमती
कुटील नितीचे ग्रहण संपूनि येण्या स्वच्छ प्रकाश
कधि रे येईल तो मधुमास

*द्वारकानाथ रामचंद्र चौधरी, सफाळे*

## घर बाळासाठीचे

घर बाळासाठीचे नकोत त्याला पक्क्या भिंती
चंद्रमौळी छपरामधुनी गगनाची लुकलुक झरावी
खुले असावे पुरते अंगण नको आत शिराया बंधन
अवती भवती बाळ सोबती घुसून होऊ दे रणकंदन

परसामाजी बगिचा थोडा असावे थोडे वृक्षही त्यात
बाळांसाठी चिखलराडा मातिलाही मान त्यात
किती खेळले, किती माखले न्हाणीघरात मोठा टब
उठ बाळा होईल सर्दी अशी नसावी वटवट

आतही नकोत पक्क्या भिंती असावा केवळ आडोसा
दुखले खुपले काही खटकले घेता यावा कानोसा
खिडकीत असावी बैठक छान गंमतजंमत बाहेरी
चिऊकाऊ झाडावरती मं मं साठी वाटेकरी

भुरभुरणाऱ्या जावळाचा गंध फटीफटींतून यावा
चिमणपाऊले, किण किण पैंजण बोबडकांदा टपकावा
खेळाचा भंडार पसरता घर सारे फुलून यावे
सावर आवर होता होता पुन:पुनरूपी जैसे थे

मम्मा-बाबा, आजीआजोबा सहजी येरझार घडावी
गाणे, गोष्ट सांग म्हणत, दुलईमध्ये मिठी पडावी
झोप झोप रे थकलो आता निद्रादेवी विनवावे
साखरझोप पाठ सोडीना भुपाळी गाते व्हावे

उचल अैशी आज्ञा होता थकणे विसरूनी उचलावे
हट्टासाठी उभयांनी एकमेकां दटवावे
बाळ आजोबा यांची गट्टी अैसी तेथे जुळून यावी
मी भक्त अन् तू विठोबा उभयाची आळीपाळी

*आर. के. सावे*



Scanned with CamScanner

श्रमिकांची मुंबई

# ताडी काढणारे 'रसिया'

फार पूर्वीची म्हणजे इंग्रजांच्या ताब्यात आलेल्या काळची मुंबई खूप मोठी होती. रोगट म्हणावी अशी. दलदल, खाजणं आणि माणसांचा राबता कमी असल्यामुळे तिला एक प्रकारचा निस्तेजपणा आला होता. परंतु असं असलं तरी त्या मुंबईत निसर्ग मात्र भरपूर होता. खारफुटीची झुडुपं, आंबे, चिंचा, वड, पिंपळ, अशी विविध प्रकारची वृक्ष, झाडं आणि त्याचबरोबर नारळ, ताडवृक्षदेखील. किनाऱ्यालगतचे कोळी आणि सारस्वत आणि पूर्वेकडील डोंगराळ भागात राहणारे आदिवासी, हीच काय ती जनसंख्या.

पूर्वी मुंबईत ताडी काढली जायची यावर आज विश्वास बसणे कठीण आहे. जोगेश्वरीला शीवटेकडीजवळ, कांदिवली, मालाड, महाकाली केव्हज् आणि आताच्या आरे कॉलनी परिसरात ताडाची झाडं भरपूर असायची. अजूनही आहेत. आणि तेथील आदिवासी या झाडांची ताडी काढायचे. अजूनही थोड्या प्रमाणात पण काढतात. जोगेश्वरी स्टेशनच्या पश्चिमेला पूर्वी खजुरांच्या झाडांची मोठी रांग होती. त्या भागाला 'खजुराची वाडी'च म्हणत. मुंबईचं जसजसं व्यापारीकरण झालं तसतसं तिचा निसर्ग उद्योगधंदे आणि कारखान्यांच्या धुराने झाकोळू लागला. खजूर, नारळ, ताडवृक्षांची बेसुमार तोड सुरू झाली आणि इथल्या श्रमिकांना श्रमपरिहारासाठी मिळणारी ताडीमाडीही बंद झाली.

मुंबईत ताडीमाडी बंद झाली खरी परंतु मुंबईच्या आसपासच्या ठिकाणांहून मुंबईला भरपूर ताडीचा पुरवठा होऊ लागला. मुंबईत ताडी पिणारे मुख्यत्वे अत्यंत कनिष्ठ स्तरावरील कामगार मजूर. दारूपेक्षा खूपच स्वस्त असणारी ताडी मुंबईत लोकप्रिय आहे ती त्यामुळेच. मुंबईजवळील वसई, पालघर, डहाणू आणि क्वचित दक्षिणेकडील पनवेल, अलिबाग येथून ताडी मुंबईत येते. ताडी काढण्याची प्रक्रिया फार कौशल्याची असते. ताडवृक्षाचे दोन प्रकार असतात अर्थात, नर आणि मादी म्हणू या. 'तळई' म्हणजे शेंगासारखी बोडं निसवणारं झाडं. तिला मादी म्हणू या. तर कांडा म्हणजे ज्या बोंडातून ताडगोळे मिळतात, तो नर. गंमत अशी की, दोन्हींकडून ताडी गाळता येते. ताडाच्या झाडाला बोंड फुटलं, (ज्याला कोती म्हणतात) की ती तो प्रथम साफ करावी लागते. त्यानंतर दोन दिवस ती कोती लोखंडी सळईने ठोकून काढायची असते. हे झालं की, तिसऱ्या दिवशी त्या बोंडाला शेव टाकायची. शेव टाकणे म्हणजे ताडी करणाऱ्याकडे असलेल्या धारदार कोयत्याने, ज्याला आऊत म्हणतात त्याने ते बोंड तोंडाकडून रोज थोडं थोडं छिलून (सोलून) काढायचं. दरम्यानच्या काळात या बोडांची वाढ होऊ नये म्हणून बोडांच्या म्हणजेच कोतीच्या बाहेरच्या बाजूने तरटाचा 'मांदोरा' घासावा लागतो. मग ती कोती वाढत नाही. चार-पाच दिवस शेव टाकल्यानंतर पाचव्या-सहाव्या दिवशी कोतीच्या तोंडातून ताडीचे थेंब गळायला लागतात. मग त्या तोंडावर मडकं बांधून ठेवायचं आणि ताडी गोळा करायची. एका झाडातून एका वेळी चार बोंडातून ताडी मिळू शकते. एका कातीतून रोज



Scanned with CamScanner

लिटरभर ताडी मिळते. कांडा म्हणजे फळ देणाऱ्या झाडातून ताडी काढली जात नसेल त्या वेळी ताडगोळ्यांचे उत्पन्न घेता येतं. एक गोळा एक रुपयानं विकला जातो.

कलेक्टर ऑफिसकडून सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या लिलावामधून ताडीच्या मालकाला ताडी काढून विकण्याचा परवाना मिळतो. त्यासाठी रु. ५०,०००/- वार्षिक भरायचे. झाडं जास्त असतील तर थोडीफार कमाई होते. पण भंडारी, (ताडी काढणारा) झाडाचा मालक व इतर खर्च विचारात घेतला तर गुंतवणूक एक लाखापर्यंत जाते. लिलाव रीतसर झाला असला तरी पाच-दहा हजार रुपये कुठे कुठे बिनहिशेबी खर्च करावे लागतात भारतीय संस्कृतीप्रमाणे. सर्वसाधारणपणे एक लिटर ताडीमागे ६ ते ७ रुपये खर्च येतो. म्हणून विक्रेत्यांना दहा ते बारा रुपये प्रति लिटर ताडी विकावी लागते.

ताडी काढण्याचा उद्योग भंडारी ज्ञातीच्या लोकांची मक्तेदारी. परंतु आता केवळ आदिवासीच नव्हेत, मलबारी म्हणजे केरळी आणि बिहारी मध्येदेखील या उद्योगात उतरलेत. फार कमी पैशाच्या मोबदल्यात ही माणसं ताडी काढण्याचा उद्योग करतात. पूर्वी केरळी माणूस फक्त नारळाच्या माडीपुरता सीमित होता. आता तो ताडाच्या झाडावरही चढतो. वसई, पालघर, डहाणूकडील कुमार यशवंत पाटील, अशोक पाटील, अविनाश राऊत, व.के.राऊत ही माणसं पारंपारिक ताडी व्यवसायवाली माणसं. म्हणजे मूळचे ज्ञाती-व्यवसायाने भंडारी. मुंबईतील ताडीविक्रीची बहुतांश दुकाने वसईकरांची आहेत. कुमार पाटील स्वत: मालक आहे आणि तोच झाडावर चढून ताडी काढतो. परंतु एरवी एका झाडावरची ताडी काढण्यासाठी प्रति लिटर २ रुपये ताडी काढणाऱ्याला द्यावे लागतात. आता हा सारा ताप परवडत नाही, असं लोक म्हणतात.

पूर्वी ताडाच्या पानावर लेखन होत असे. कालानुरूप ताडाच्या रसापासून विनेगर, दारू, गूळही बनू लागला. परंतु बंगाल, विशाखापट्टण, केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजराथच्या पश्चिम किनारपट्टीत ताडी किंवा माडी क्वचित खजुराचीही ताडी आणि ताडीवाले आजही लोकप्रिय आहेत.

**- संदिप राऊत**

## घुसमट

"आई, आपला जन्म कुत्र्याच्या योनीत झाला असता तर किती बरे झाले असते. नाही का?"

"अरे, हे काय बोलतोस बाळा?"

"कारण, त्या घाऱ्याशेठचा कुत्रा बघ. त्याला कित्ती कित्ती खायला मिळते! दूध काय, मांस काय, बिस्कीटे काय! बघ कसा गलेलठ्ठ झालाय. शिवाय, श्रीमंतांचे श्वान म्हणून गावातही त्याची शान आहे. नाहीतर आपण! शिळंपाकं अन्न मागायला गेलो तर शेठ आपल्याला झिडकारतातच. शिवाय आपल्याला पळवण्यासाठी अंगावर कुत्रे सोडतात. आई, आपण खरेच इतके फालतू आहोत का गं? आपण इतके..."

पोराची घुसमट ओठावर प्रकटली. उत्तर देण्याऐवजी मातेची अश्रूंनी डबडबलेली नजर जमीनीकडे वळली. आपण सारे देवाची लेकरे आहोत, हे सत्य आपल्या बाळाला सांगण्याचे धाडस त्या मातेला झाले नाही.



Scanned with CamScanner

# माहेरची माया

"रुणझुणत्या पाखराऽऽ, जा रे माझ्या माहेराऽऽ" या गाण्यामधून बायकांना माहेरची ओढ किती असते हे जाणवते. म्हणूनच ती सासुरवाशीण अंगणातल्या झाडावर बसलेल्या पाखराला पाहताच त्याला माहेरी जायला सांगते. आपल्या आईला, भावाला निरोप देते व मी इथे सुखी, आनंदी आहे म्हणून आईला खुशालीही कळवते. आजची सासुरवाशीण मात्र म्हणेल, "त्याला पाखरू कशाला? माझा मोबाईल आहे ना? मी लगेच ई-मेल करीन."



पूर्वी बाईला माहेरचं कुत्रं जरी दिसलं तरी ती किती आनंदित होत असे. आमच्या जमान्यात म्हणजे ४०-५० वर्षांपूर्वी लग्नानंतर मुलगी सासरी जायला निघाली की ती अगदी हमसून हमसून रडायची. तिचे रडणे पाहून आजुबाजूच्या लोकांच्याही डोळ्यांत पाणी यायचे. पण आज दिसते का हे दृश्य? तुम्ही म्हणाल, 'जमाना बदलला आहे,' कबूल. पण जमान्याबरोबर भावनाही बदलतात कां? आणि दुर्दैवाने त्याचे उत्तर 'होय' असेच द्यावे लागते. याला कारण म्हणजे माहेरची 'माया' - प्रॉपर्टी. सन १९५६मध्ये वारसाहक्क कायदा अंमलात आला. त्यात वडिलोपार्जित इस्टेटीत मुलांबरोबर मुलींनाही हक्क प्राप्त झाले. तेव्हापासूनच माहेरची माया-ममता, ओढ, जिव्हाळा या गोष्टींना ओहोटी लागली.

आज आपण पाहतो कितीतरी मुलींनी माहेरच्या इस्टेटीत हिस्सा मिळविण्यासाठी एकदम टोकाची भूमिका घेतली आहे. अगदी कोर्टकचेऱ्यापर्यंत जाऊन पैशाचा व वेळेचा अपव्यय चालवला आहे. हे टाळायचे असेल तर दोन्ही बाजूंनी सामंजस्याने तोडगा काढण्याचा प्रयत्न करायला हवा. मला ह्या मुलींचे मोठे आश्चर्य वाटते की ज्या घरात तुम्ही तुमच्या आयुष्याची २०-२२ वर्षे घालवलीत तिथले आचार-विचार अंगिकारले, संस्कार ग्रहण केले त्या घराला केवळ हिश्श्यासाठी तुम्ही विसरून जाता? आईची माया, वडिलांचे प्रेम, भावंडांची ममता - सगळं सगळं एका फटक्यात तोडून टाकता? कां? एखाद्या मुलीचे सासर आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असेल आणि तिने जर भावाजवळ मागणी केली तर ते



Scanned with CamScanner

आपण समजू शकतो. पण हक्क म्हणून जर मागू लागलात तर तिथे कटुता निर्माण होते. हा प्रश्न सामंजस्याने सोडवण्याचा प्रयत्न केला तर सुटू शकतो. पण हे सामंजस्य दोन्हीकडून दाखवायला हवे.

आज माझ्या परिचितांमध्ये तसेच नात्यामध्येही वारसाहक्कामुळे कटुता निर्माण होऊन मुली माहेराला मुकल्याची पाच ते सहा उदाहरणे आहेत. त्यातील तीन उदाहरणांत तर बहिणी चांगल्या सुखवस्तू कुटुंबात दिल्या आहेत. त्यांनी ह्या इस्टेटीचा लोभ का धरावा? आजपर्यंत तुमचे माहेरपण नीट रीतीने होत होते ना? बाळंतपण, सणवार, देणं-घेणं सर्व व्यवसिथतपणाने होत असताना त्यात खोडा का घालावा? साधारणत: वडिलांच्या पश्चातच ह्या घटना घडतात. आई बिचारी अगतिक असते. तिला इथे मतच नसते कारण मुली तिच्याच व मुलगेही तिचेच असतात. कोणाची बाजू घ्यावी हे बिचारीला कळतच नाही. शेवटी तिला मुलाच्याच घरात दिवस काढायचे असतात. म्हणून ती गप्प राहते.

ह्या सर्वांचा परिणाम काय होतो ठाऊक आहे का? भाऊबीजेला सख्खा भाऊ असूनही तिला मानलेल्या भावाला ओवाळावे लागते. आणि मुलांच्या लग्नातही असाच मानलेला मामा मोशांळ्यासाठी उभा करावा लागतो. ह्या सर्वांवर एक उपाय आहे तो म्हणजे घरातील कर्त्या पुरुषाने आपले मृत्युपत्र तयार करून इस्टेटीच्या वाटण्या करून ठेवाव्या म्हणजे हा वादच मिटेल असे मला वाटते.

माझी एक ब्राह्मण मैत्रीण आहे. ती मला म्हणाली, "आमच्यात या भानगडीच नाहीत. कारण आम्ही मुलींना जे काय द्यायचे ते लग्नातच हुंड्यांच्या रुपात देऊन मोकळे होतो. शिवाय वर्षभराचे सणवारही व्यवस्थित करतो. दुसरी गोष्ट म्हणजे आमच्या लोकांत तुमच्या एवढ्या इस्टेटीच नसतात.'' परवाच आमच्या महिला मंडळात काव्यगायन स्पर्धा ठेवल्सा होत्या. त्यात भावगीत, भक्तीगीतांप्रमाणेच लग्नगीते हा प्रकारही होता. एक भगिनी तन्मयतेने गात होती -

"थांब थांब रे ईश्वरा, माझ्या आईची भेट घेते ।
आईची भेट घेते लेक खळखळा रडते ॥"

मला हे ऐकून हसू आले. बिचारी ती भगिनी गडबडली. तिला वाटले आपले काहीतरी चुकले. नंतर तिने मला हसण्याचे कारण विचारले. मी तिला म्हटले, "छे, छे, तुझे काहीच चुकले नाही. पण मला वाटते या गाण्यात थोडा बदल करावा." शेवटची ओळ आहे तिच्यात बदल करून अशी म्हणावी, "आईची भेट घेते आई खळखळा रडते।"

***- मालती सावे***

---

# या मनाला...

या मनाला भावनांचा पूर यावा
अन् मनिचा चंद्रमा हृदयी हसावा
मंद, कुंद, गंधित मती, धुंद ही व्हावी
शब्द-सुमांची माझ्या, मालिका बनावी

उद्यान मनिचे शब्दगंधे खुलावे
गुलाब, चाफा, मोगरा मी प्रसावे
माळेत माझ्या मौक्तिकांनी रूळावे
वाग्देवी, मला तू सोयरे करावे.

*- रमाकांत त्रिंबक ठाकूर*



Scanned with CamScanner

# शाळा / महाविद्यालये / वाचनालये यांना वार्षिक सभासदत्वासाठी आवाहन

काही अपरिहार्य कारणामुळे आम्हाला विचार प्रसार या मासिकाची किंमत २ /- रुपये करावी लागली. आमचे विचार सर्वांपर्यंत पोहोचावेत, समाजात रुजावेत, शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत ते पाझरावेत असे आम्हाला वाटते. आमची प्रामाणिक इच्छा व वस्तुस्थिती यात बरेच अंतर आहे. हे अंतर कमी व्हावे व आमच्या वाचकांची संख्या वाढावी म्हणून आम्ही वार्षिक सभासदाची योजना पुढे आणत आहोत. वार्षिक सभासद होणाऱ्याला हे मासिक केवळ एक रुपयात मिळणार आहे. त्यांनी वार्षिक सभासदत्वासाठी आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि वर्षाचे बारा रुपये (धनादेश, मनी ऑर्डर अथवा रोख स्वरुपात) आमच्या पत्त्यावर पाठवावेत. त्यांना अंक पोस्टाने पाठवण्याची आम्ही व्यवस्था करू. कोणतीही चळवळ ही एकमेकांच्या सहकार्याशिवाय पुढे वाटचाल करू शकत नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. आम्हीही हे सत्य नाकारत नाही. आमचा पत्ता आहे -

श्री. राजेंद्र ग. डोंगरे, ७/१, डोंगरे सदन, परेरा वाडी, साकीनाका, मुंबई - ४०० ०७२

contact (022) 28504088

**BENEDICT**

**PRINTERS**

SPECIALIST IN :
OFFSET, SCREEN, LETTER PRESS
ALL TYPES OF BOOK BINDING AND D.T.P.

D'SOUZA SADAN, NO. 1, NEAR ANAND BABA ASHRAM, BEHIND

With Best Compliments From

*Hari Kumar*

# HARI SHREE ALUMINIUM WORKS

ALUMINIUM DOORS, WINDOWS RAILINGS,
SINTEX DOOR, PARTITION & ALL ALUMINIUM WORKS

Gala No. 5, Dongre Sadan, Sakinaka, Mumbai - 400 072
Off. C/o. : 2859 2948, 2852 6208
Mob. : 9821624312 Res. : 5601 8030

---

# KANNA
## TOURS & TRAVELS

BUS, CARS, QUALIS, TATA SUMO & PACKAGE TOURS

Room No. B/1, Dongre Sadan, Sakinaka, Mumbai - 400 072
Mob. : 9821624312, 9821752421, 9869073269
Res. : 5601 8030




Scanned with CamScanner

With Best Compliments From

*Jitendra*

# WESTERN BUSINESS CORPORATION

SALES / SERVICE - FAX, COMPUTER, KTS, EPABX, AMC UNDERTAKEN

Shivner Sadan, Mohili Village,
Sakinaka, Mumbai - 400 072
Tel. No. 2859 29 48 / 49 Fax. : 2851 82 54

**'विचार प्रसार'च्या अंकास हार्दिक शुभेच्छा !**

# शिवनेर

## इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी

MS-CIT कोर्स

C-DAC चे विविध कोर्सेससाठी प्रवेश सुरू आहे त्वरा करा!

ही सुवर्णसंधी दवडू नका

**संपर्क**

८/१ए शिवनेर सदन, परेरा वाडी, साकीनाका,
मुंबई - ४०० ०७२ दूरध्वनी क्र. २८५१३३४५

With Best Compliments From

*Ignatius Fernandes*

*Umesh*

# FERN'S GARAGE

## AUTOMOBILE SERVICE CENTER

Specialist in

MECHANICAL, TIN JOB, PAINTING,
ELECTRICAL JOB OF
INDIAN & IMPORTED,
PETROL & DIESEL VEHICLES

Opp. Tata Infotech, B Cross Road, J. B. Nagar,
MIDC Andheri (E), Mumbai - 400 059
Mobile - 9892891107



हे मासिक मालक श्री. श्री. शंकर मुकुंद पोखरकर यांच्यासाठी प्रकाशक श्री. राजेंद्र ग. डोंगरे यांनी स्मिता एंटरप्रायझेस, शिवनेर सदन, मोहीली व्हिलेजए साकीनाका, मुंबई - ७२ येथे छापून ७/१, डोंगरे सदन, परेरा वाडी, साकीनाका, मुंबई - ४०० ०७२ येथे प्रसिद्ध केले. (या मासिकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. संपादक नारायण डोंगरे - संपर्क : ९८३३०७६२३४

MAH/MAR/26477/131/2004-TC